**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र ११५ दिनांक- २९/०४/२०२१

## वालीव पोलीसांकडुन महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत असलेला ५६,५६,०००/- रुपये किंमतीचा गुटखा वाहतुक करताना कंटेनरसह जप्त.

दिनांक २७.०४.२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक नागालँड पासिंगच्या कंटेनर मधुन महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत असलेला गुटखा नामक पदार्थाची अवैधरित्या वाहतुक कामण परीसरातुन होणार असलेबाबत माहीती मिळाली. मिळालेल्या बातमीप्रमाणे मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सुचना निर्गमीत केल्या त्या प्रमाणे वालीव पोलीस ठाणेचे सपोनि/ ज्ञानेश फडतरे व अंमलदार यांनी दि.२८.४.२०२१ रोजी ०१:१० वाजता मुंबई बाजुकडुन गुजरात बाजुकडे जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ वरील मौजे सोपारा फाटा, नालासोपारा पुर्वेकडील पेल्हार उडाणपुलाचे नजीक प्रभात हॉटेलजवळ सार्वजनिक हमरस्त्यावर तपकिरी रंगाचा नागलँड पासिंगचा कंटेनर व चालक नामे.शकिल मोहम्मद समीम खान रा. ठि. मु. पो. गुसायगंज ता. गुसायगंज जि. कन्नोज राज्य : उत्तर प्रदेश यास थांबवून ताब्यात घेतले.

नमूद कंटेनरची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र राज्य प्रतिबंधीत असलेला ३६ लाख ५६ हजार रुपये किंमतीचा तंबाखुजन्य सुगंधीत पान मसाला व २० लाख रुपये किंमतीचे कंटेनरसह असा एकुण **५६ लाख ५६ हजार किंमतीचा मुद्देमाल** कब्जात बाळगुन त्याची वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने कंटेनर चालक यास ताब्यात घेण्यात आले.

**वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नंबर I ४१४/२०२१ भारतीय दंड संहिता कलम २७३, १८८, ३४ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२),४,३०(२)(ए) अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि/ज्ञानेश फडतरे करीत आहेत.**

वरील कामगिरी.श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री.अमोल मांडवे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब कारांडे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मुकेश पवार, मनोज मोरे, पो.ना/ किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.अंम./ विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बळीद, गजानन गरीबे, अल्फाफ शेख, राहुल पवार यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner